दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १९० • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार, दि.१५ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# पाकिस्तानला भारतीय सैन्याची ताकद दिसली-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भारत झुकणार नाही, हे ऑपरेशन सिंदूरने दाखवून दिले

**मुंबई (वृत्तसंस्था):भारतीय सेनेने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर यशस्वीपणे राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर या धाडसी मोहिमेच्या पार्श्वभूमीवर देशभरात उत्साहाचे वातावरण आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल भारतीय सेनेचे आभार मानण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने महाराष्ट्रात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून मुंबईत आज भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. मुंबईच्या ऑगस्ट क्रांती मैदानावर या रॅलीचा समारोप झाला.या समारोप सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप नेते आशिष शेलार, पंकजा मुंडे, मंगलप्रभात लोढा, प्रवीण दरेकर, अतुल भातखळकर, चित्रा वाघ यांच्यासह भाजपचे अनेक नेते आणि हजारो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ठिकाणी झालेल्या सभेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी भारतीय सेनेच्या पराक्रमाचे जाहीर कौतुक केले आणि पाकिस्तानला दिलेल्या कडक प्रत्युत्तराचा उल्लेख करत देशवासियांना अभिमानाची जाणीव करून दिली.**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ऑपरेश सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सेनेने दाखवून दिले, हमें कोई झुका नहीं सकता, हम ना झुकेंगे, न बिकेंगे, न थकेंगे अशा प्रकारे भारतीय सेनेची ताकद काय आहे? ही ताकद आपल्याला ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाहायला मिळाली. पहलगामध्ये आमच्या २५ बांधवांना ज्याप्रकारे धर्म विचारून मारण्यात आले. कुटुंबासमोर मारण्यात आले. बायकोसमोर नवऱ्याला मारले, मुलांसमोर बापाला मारले, अशा प्रकारचे बर्बरतापूर्ण हत्याकांड या भारताच्या नव्हे, तर जगाच्या इतिहासात अलिकडच्या काळात आपल्याला पाहायला मिळाले नव्हते.मोदींच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर हे लॉन्च केले. आमच्या भगिनींचे कुंकू पुसण्याचे काम ज्या दहशतवाद्यांनी आणि ज्या देशाने केले होते, त्याला नेस्तनाबूत करण्यासाठी ऑपरेशन सिंदूरची सुरुवात झाली. ऑपरेशन सिंदूरमध्ये अतिशय अचूक पद्धतीने भारतीय सैन्याने पाकिस्तानमध्ये घुसून आतंकवाद्यांचे ९ अड्डे उद्ध्वस्त करून टाकले, असे फडणवीस म्हणाले.देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा एकही हल्ला यशस्वी होऊ शकला नाही, याचा मला अभिमान आहे. त्यांनी मोठ्याप्रमाणात मिसाइलचा वापर केला, पण त्यांचे सगळे मिसाइल भारतीय सेनेने हवेतच उडवून दिले. त्यांनी ड्रोनचा वापर करायचा प्रयत्न केला, तरीही त्यांचा एकही ड्रोनचा हल्ला यशस्वी होऊ शकला नाही. त्यांनी एफ-१६ चा वापर करायचा प्रयत्न केला, त्यांचे एफ-१६ पाडण्याचे काम आपल्या डिफेन्स सिस्टिमने केले. भारताने हे दाखवून दिले की, आमची डिफेन्स सिस्टिम इतकी मजबूत आहे की, त्याच्यामध्ये घुसण्याची ताकद पाकिस्तानची नाही, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.भारतीय सैन्य अभेद्य आहे. सैन्याच्या शौर्याच्या सन्मानासाठी, भारताची ताकद जगाला दाखवण्यासाठी ही तिरंगा यात्रा काढण्यात आली आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

**“ मला सर्वात जास्त आनंद कशाचा असेल, तर ज्या ठिकाणी हरामखोर कसाबने प्रशिक्षण घेतले. तो अड्डा देखील नेस्तनाबूत करण्याचे काम केले. इतकेच नाही, तर आपल्या मुंबईचे अपराधी असलेले मकसूद अजहर, अबू जिंदल त्यांनाही ठोकण्याचे काम आपल्या सैन्याने केले. पाकिस्तानातील पंजाब प्रांतात शेवटच्या टोकाला जिथे त्यांना वाटायचे इथे कधीच भारतीय सेना पोहोचू शकत नाही. म्हणून सगळ्या आतंकवाद्यांना सगळ्या परिवारासह राहण्यासाठी जागा दिली होती. ज्या ठिकाणी या आतंकवाद्यांसाठी सेफ हाउस तयार केले होते. नेमके तिथेच जाऊन भारतीय सेनेने ठोकले आणि सगळे अड्डे उद्ध्वस्त केले. भारतीय सैन्याने दाखवून दिले की, तुम कहीं पर छुपोगे, हम घुसकर मारेंगे, हम तुमको छोडने वाले नहीं है, असेही मुख्यमंत्री म्हणाले.**

**“ पाकिस्तान भारतावर एकही हल्ला यशस्वीपणे करू शकला नाही. पण ज्यावेळी त्यांनी हल्ला केला, त्यावेळी त्याला प्रत्युत्तर देण्याकरिता भारताने जेव्हा त्यांच्या सैन्य तळांवर हल्ला केला, तेव्हा पाकिस्तान घाबरला. पाकिस्तानला भारताची ताकद माहिती नव्हती. ब्रम्होस ताकद माहिती नव्हती. ज्यावेळी त्यांचे एक-एक सैनिकी तळ उद्ध्वस्त झाले, त्यावेळी हाच पाकिस्तान सगळ्या देशांकडे गेला. आता मध्यस्थी करा, युद्धबंदी करा, अशी विनवणी केली. भारताने सांगितले, पाकिस्तानला युद्धबंदी करायची असेल, तर त्याने आमच्यापुढे गुडघे टेकावे. त्यांच्या सैनिकी अधिकाऱ्यांनी आम्हाला फोन करून विनंती करावी, तर आम्ही युद्धबंदी करू. पाकिस्तानच्या सेनेला आपल्याला फोन करून विनंती करावी लागली. त्यानंतर ही युद्धबंदी झाली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

# भारतीय सैन्याच्या शौर्याला समर्पित तिरंगा रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हा-आ.किशोर जोरगेवार

## १७ मे ला शहरातुन निघाणार तिरंगा रॅली, नियोजन बैठक संपन्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आपल्या जवानांनी दाखवलेली धैर्यशीलता, रणनीती आणि समर्पण हे प्रत्येक भारतीयाच्या हृदयात अभिमान निर्माण करणारे आहे. त्यांचे हे योगदान केवळ सीमारेषेवरच नव्हे, तर देशाच्या प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षेसाठी आहे. ऑपरेशन सिंदुर च्या यशानंतर सैन्याच्या पराक्रमाचा गैरव वाढविण्यासाठी आयोजित होत असलेल्या तिंरगा रॅलीत सर्व देशभक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहण आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

ऑपरेशन सिंदूर च्या यशा नंतर भारतीय सैन्याचे मनोबल वाढविण्यासाठी, सैन्याच्या पराक्रमाला सलाम करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभरात तिरंगा रॅली काडण्यात येणार आहे. या अंतर्गत चंद्रपूर मतदार संघातही १७ मे ला रॅलीचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ५ वजता शिवाजी चौकातून सदर रॅली काडण्यात येणार आहे. याची नियोजन बैठक आमदार किशोर जोरगेवार यांच्या अध्यक्षतेत कार्यालयात पार पडली. यावेळी ते बोलत होते.



या बैठकीला भारतीय जनता पार्टीचे ओबीसी नेते अशोक जीवतोडे, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष रघुविर अहिर, माजी शहर अध्यक्ष दशरथसिंह ठाकूर, तुषार सोम, नामदेव डाहुले, माजी नगर सेवक सुभाष कासगोट्टूवार, प्रकाश देवतळे, मनोल पाल, प्रदिप किरमे, श्याम कणकम, राहुल घोटेकर, देवानंद वाढई, पुष्पा उराडे, शितल आश्राम, कल्पना बबुलकर, राजु अडपेवार, सविता दंढारे, शितल गुरुनुले आदिंची प्रमुख्तेने उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे, ज्यामार्फत आपण आपल्या सैन्याच्या पराक्रमाला सलाम करणार आहोत. याच रॅलीचा भाग म्हणून चंद्रपूर मतदार संघातही भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात येणार आहे. सर्वजण एकजुटीने ही रॅली लोकसहभागात पार पाडू. ही केवळ एक मिरवणूक नसून, भारतीय सैनिकांप्रती असलेला आदर, एकता आणि राष्ट्रप्रेमाची भावना जनतेसमोर व्यक्त करण्याचे हे एक सशक्त माध्यम आहे. या रॅलीमध्ये तरुण वर्ग, महिला मंडळं, स्वयंसेवी संस्था, विविध सामाजिक व सांस्कृतिक संस्था, शाळा-विद्यापीठांचे विद्यार्थी, विविध समाज बांधव यांनी मोठ्या संख्येने सहभागी होणे गरजेचे आहे. या रॅलीत प्रत्येकाच्या हातात तिरंगा आणि मनात मातृभुमीसाठी अभिमान असेल असेही ते यावेळी म्हणाले. या बैठकीत रॅलीचे उत्तम नियोजन करण्यात आले. तसेच आलेल्या सुचना विचारात घेण्यात आल्या. बैठकीला भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांसह नागरिकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# इरई नदी खोलीकरणासाठी उद्योगांचाही पुढाकार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर शहरात होत असलेल्या इरई नदीच्या खोलीकरण अभियानात आता जिल्ह्यातील उद्योगांनीही पुढाकार घेतला आहे. विविध उद्योगांनी आपल्या सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर फंड) नदीच्या खोलीकरणासाठी साहित्य उपलब्ध करून दिले असून यात पोकलेन, टिप्पर आणि हायवा यांचा समावेश आहे.

चंद्रपूर शहराची जीवनवाहिनी असलेल्या इरई नदीच्या खोलीकरणाच्या कामाचा शुभारंभ राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते २५ एप्रिल रोजी करण्यात आला. पहिल्या टप्प्यात रामसेतू ते चौराळा पूल या दरम्यान खोलीकरण करण्यात येत आहे. सद्यस्थितीत चार ठिकाणी काम सुरू आहे. यासाठी लॉयड्स मेटल्स कंपनीने सीएसआर निधीतून ३ पोकलेन मशीन तसेच ६ टिप्पर / हायवा उपलब्ध करून दिले आहेत. तर अल्ट्राटेक सिमेंट उद्योगाने १ पोकलेन मशीन आणि २ हायवा खोलीकरणासाठी दिले आहेत.

याशिवाय चार वेगवेगळ्या ठिकाणावर एकूण ८ पोकलेन मशीन कार्यरत असून यात जलसंपदा विभागाचे ३, सीएसआर निधीतून १ आणि चंद्रपूर



महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ४ पोकलेनचा समावेश आहे. तसेच खोलीकरणासाठी एकूण १३ टिप्पर / हायवा, जेसीबी आणि २१ ट्रक्टर कार्यरत आहेत. आतापर्यंत नदी पात्रातून २१ टीसीएम गाळ (अंदाजे ७५०० ब्रास) काढण्यात आला असून २६ शेतक-यांना ११५८ ब्रास गाळ मोफत वाटप करण्यात आला आहे. गाळ नेण्यासाठी आतापर्यंत ४२ शेतक-यांनी अर्ज केले आहेत.

शासन, प्रशासन आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून इरई नदी खोलीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील इतरही उद्योगांनी आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आयटीआयला जागतिक दर्जाच्या केंद्रात रूपांतरित करणाऱ्या धोरणाला शासनाची मंजुरी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना (आयटीआय) जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण संस्थांमध्ये रूपांतरित करून उद्योगांच्या गरजेनुसार अत्याधुनिक प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यात येणार आहे. याबाबत कौशल्य, रोजगार आणि नाविन्यता विभागाने तयार केलेल्या सार्वजनिक-खाजगी भागीदारी अर्थात पीपीपी धोरणाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.या धोरणामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षण, संस्थेतील पायाभूत सुविधा, जागतिक दर्जाच्या कंपन्यांमध्ये थेट उमेदवारी प्रशिक्षण आणि कंपन्यांच्या भागीदारीमुळे प्रशिक्षणार्थींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या रोजगाराच्या जागतिक संधी उपलब्ध होणार आहेत. सदर धोरणामार्फत काळानुरूप, नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम शिकवले जातील आणि २ लाख आयटीआय विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

असे असेल पीपीपी धोरण : अग्रगण्य कॉर्पोरेट्स, औद्योगिक संघटना, परोपकारी व्यक्तींना अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी, अत्याधुनिक जागतिक प्रशिक्षण सुविधा प्रदान करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. तसेच उद्योगांचा सामाजिक दायित्व निधीद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सहभाग वाढवला जाईल. यातधोरणाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इन्स्टिटयूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) धोरणात्मक भागीदार म्हणून काम करणार आहे. आयटीआयला त्यांचे स्थान, मूल्यांकन आणि संभाव्यतेच्या आधारे तीन याद्यांमध्ये विभागले जाईल. आयटीआयच्या जागेची आणि इमारतीची मालकी सरकारकडे राहील. आयटीआयबाबत सरकारची धोरणे कायम राहतील. शिक्षक कर्मचाऱ्यांसह कर्मचारी कायम राहतील. तथापि, अतिरिक्त अभ्यासक्रमासाठी अतिरिक्त कर्मचारी भागीदार उद्योगाद्वारे नियुक्त केले जाऊ शकतात.उद्योगासह गुंतवणुकीद्वारे इमारत दुरुस्ती, अत्याधुनिक प्रयोगशाळा, स्मार्ट वर्ग खोल्या आणि डिजिटल शिक्षण सुविधा उभारण्यात येतील. पहिल्या टप्प्यात राज्यातील किमान २५ औद्योगिक प्रशिक्षण संस्था निवडण्यात येतील, त्यानंतर प्रायोगिक उपक्रमांचा आढावा घेऊन १०० प्रशिक्षण संस्था पीपीपी धोरणात समाविष्ट केल्या जातील. औ.प्र.संस्था उद्योग भागीदारांसह संयुक्त प्रमाणपत्र प्रशिक्षण कार्यक्रम राबवतील. अभ्यासक्रमात प्रशिक्षण नोंदणीकृत प्रशिक्षणार्थी आणि बाह्य उमेदवारांनाही प्रशिक्षण देण्यात येईल. शासनातील अंतर्गत नियमानुसार प्रशिक्षणार्थींना प्रतिपूर्ती देण्यात येईल. तर बाह्य उमेदवारांना हे प्रशिक्षण शुल्क भरावे लागेल.

बदलते अभ्यासक्रम : पीपीपी धोरणामुळे विद्यार्थ्यांना जागतिक औद्योगिक प्रशिक्षणाची संधी. -ख, सायबर सुरक्षा, ई लर्निंग प्लॅटफॉर्म, ऑटोमोटिव्ह मॅनुफॅक्चरिंग, आयओटी आणि रोबोटिक्स आणि हरित ऊर्जा सारख्या जागतिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेता येईल. प्रात्यक्षिक ज्ञानावर अधिक भर, उद्योगांच्या अनुषंगाने आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार होण्यास मदत. प्रशिक्षणार्थींना स्टार्ट अप्ससाठी मार्गदर्शन, कार्यक्षेत्र आणि निधी सहाय्य प्रदान करणारे कॅम्पस आणि विविध रोजगार मेळाव्यांचे आयोजन त्यात थेट कंपन्यांचा सहभाग.महाराष्ट्रातील सार्वजनिक-खाजगी (पीपीपी) भागीदारी धोरणाद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची उन्नती करणे. उद्योगाच्या मागणीनुसार सुसंगत कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी भागीदारी धोरण हे एक ऐतिहासिक पाऊल आहे. या धोरणामुळे महाराष्ट्रात जागतिक दर्जाचे कौशल्य केंद्र स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे.

# वन्यजीव हल्ले रोखण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करा-आ.किशोर जोरगेवार

## वन विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेत दिले निर्देश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात वाघांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर चंद्रपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या अध्यक्षतेखाली रामबाग विश्रामगृहात वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीत मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, उपसंचालक (भा.प्र.से.) कुशाग्र पाठक, उपवनसंरक्षक (भा.प्र.से.) श्वेता बोड्डू, मध्य चांदा वन विभागाचे सहायक वनसंरक्षक अदिश शेंडगे, तसेच चंद्रपूर वनविभागाचे सहायक वनसंरक्षक विश्रांत तडसे, प्रकाश देवतळे, माजी नगर सेवक सुभाष कासनगोट्टूवार यांच्यासह वन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांवर नियंत्रण मिळवणे, नागरिकांचे संरक्षण सुनिश्चित करणे, तसेच स्थानिकांचा सहभाग वाढवणे यावर सखोल चर्चा झाली. बैठकीदरम्यान आ. किशोर जोरगेवार यांनी



जिल्ह्यातील नागरिक सतत धास्तीच्या वातावरणात राहू शकत नाहीत. वनविभागाने तातडीने उपाययोजना आखून अंमलात आणाव्यात, तसेच नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांना योग्य त्या सूचना द्याव्यात असे निर्देश दिले.

यावेळी आ. जोरगेवार म्हणाले, वाघांच्या हलचालींबाबत माहिती देण्यासाठी गावात बातमीदार यंत्रणा सक्रिय करावी, तसेच वनविभागाचे पथक २४ तास सज्ज ठेवले जावे. लोकांच्या सुरक्षेसाठी शासनाच्या विविध योजना तत्काळ लागू करून नुकसानग्रस्तांना तातडीची मदत द्यावी.असेही ते यावेळी म्हणाले. या बैठकीत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध निर्णय घेण्यात आले असून, वनविभाग आणि स्थानिक प्रशासन परस्पर समन्वयाने काम करणार असल्याचे यावेळी ठरविण्यात आले.

---

### छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

# ग्रामसेवक, उपसरपंच व सदस्यांचा अनुपस्थितीमुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी

## नवरदेवाच्या हस्ते पूजन, उपस्थित नागरिकांनी दिली आदरांजली

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती महाराष्ट्रभर मोठ्या उत्साहात साजरी केली जात असताना, वैजापूर तालुक्यातील गोळवाडी ग्रामपंचायतीतही ही जयंती अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडली. मात्र, ग्रामसेवक, उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य या कार्यक्रमाला गैरहजर राहिल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



विशेष बाब म्हणजे, या कार्यक्रमाचे पूजन बोहल्यावर चढणाऱ्या नवरदेव राम पगार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी प्रतिमेला पुष्प अर्पण करून पूजन केले आणि त्यानंतर विवाहसोहळ्यासाठी प्रस्थान केले. या घटनेला उपस्थित ग्रामस्थांनी विशेष मान दिला.

या प्रसंगी सरपंच भाऊसाहेब पाटील शिंदे, संगणक चालक ज्ञानेश्वर पगार, शिपाई दगू आप्पा गावंडे, विक्रम पांडुरंग शिंदे, गणेश पगार, भाऊसाहेब साळुंखे, भाऊसाहेब मिसाळ, गफूर भाई, सुदाम थोरात, कृष्ण पगार तसेच दैनिक सह्याद्रीचा राखणदारचे प्रतिनिधी अर्जुन शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.ग्रामपंचायत कार्यालयातच ही जयंती साजरी करण्यात आली असतानाही, लोकप्रतिनिधींचा सहभाग न राहणे हे लोकशाहीच्या दृष्टीने खेदजनक असल्याची प्रतिक्रिया काही ग्रामस्थांनी व्यक्त केली.

---

# न्यू इंग्लिश स्कूल कोल्हारचा बारावीचा निकाल १०० टक्के; दहावीचा निकाल ८२.४१ टक्के

**कोल्हार । प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (कला), कोल्हार बु. ता. राहाता, जि. अहिल्यानगर या विद्यालयाने निकालात यंदा उल्लेखनीय यश मिळवले आहे. बारावीचा शंभर टक्के लागला असून दहावीचा निकाल ८२.४१ टक्के इतका लागला आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे विद्यालयाच्या गुरुकुल विभागाचा दहावीचा निकालही शंभर टक्के लागला आहे.







बारावीच्या परीक्षेत कु. खरात चैताली हेमेंद्र हिने ६८.८३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. शेख आलिया अल्ताब हिला ६६.६७ टक्के गुणांसह दुसरा क्रमांक तर कु. हकीम सिफा अब्दुल मुख्तार हिला ६६.१७ टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळाला. दहावीच्या परीक्षेत जाधव श्लोक अण्णासाहेब याने ९३.४० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे कु. मांडुळे गायत्री बापूसाहेब आणि कदम अथर्व संतोष यांनी प्रत्येकी ९२.६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. पुजारी तनिष्का सोपान हिने ९१.८० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.

दहावीच्या परीक्षेस एकूण १८२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ६६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह तर ३८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. या यशस्वी निकालाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य अंकुशराज जामदार यांनी समाधान व्यक्त केले आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू पाटील, स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील, जनरल बॉडी सदस्य रावसाहेब म्हस्के पाटील, संतोष थेटे, अजीत मोरे, बी. के. खर्डे, अशोक शेट आसावा, पांडुरंग देवकर पाटील, संजय शिंगवी, विभागीय अधिकारी बोडखे , सहाय्यक विभागीय अधिकारी नाईकवाडी साहेब, मुख्याध्यापक अंकुशराज जामदार, उपमुख्याध्यापक सीताराम बोरुडे, पर्यवेक्षिका संजीवनी आंधळे तसेच सर्व शिक्षक, ग्रामस्थ आणि पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

---

# वांगी बु.येथे ग्रामस्थांकडून छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन



**पिशोर । जावेद शेख**

वांगी बुद्रुक (ता. वैजापूर) येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ग्रामस्थांच्या वतीने अभिवादन कार्यक्रम पार पडला. यावेळी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.या प्रसंगी विजय काकडे, गंगाधर साळवे, सागर साळवे, चंद्रकांत जाधव, कैलास काकडे, किसन साळवे, एकनाथ जाधव, दिनेश काकडे, नईम पठाण, संपत काकडे, गजानन काकडे, संतोष तायडे,चोरमारे, अशोक साळवे, लक्ष्मण काकडे, अनिल काकडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात ग्रामस्थांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचे स्मरण करत एकजुटीने अभिवादन केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

# लोकमान्य विद्यालयाचा दहावीचा निकाल ९०.९६ टक्के; तुषार चौधरीने मिळवला प्रथम क्रमांक

**वरोरा । प्रतिनिधी**

नुकत्याच जाहीर झालेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या निकालात लोकमान्य विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे.



विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान तुषार वसंता चौधरी याने मिळविला. तुषारने ९५.६० टक्के गुण प्राप्त केले असून, संस्कृत विषयात त्याने १०० टक्के गुण मिळविले आहेत. द्वितीय स्थान ओम कृष्णा चकोले ९०.४० टक्के गुणांसह तर तृतीय स्थान आर्यन मधुकर डफ याने ८७.८० टक्के गुण प्राप्त केले.लोकशिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पाटील, उपाध्यक्ष विकास घुडे, सचिव विश्वनाथ जोशी, दुष्यंत देशपांडे, मंगेश मल्हार, तसेच मुख्याध्यापक राहुल राखे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकांचे उत्तम निकालाबद्दल अभिनंदन केले आहे.

---

### शेतकऱ्याच्या मुलीनं मारली बाजी

# सिंदी केंद्रातून प्रथम येत अक्षरा घोडमारेन मिळवले ९३.८० टक्के गुण

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर सिंदी (रेल्वे) येथील एका शेतकऱ्याच्या मुलीने दहावीच्या परीक्षेत उत्तुंग यश मिळवत संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून घेतले आहे. अक्षरा निलेश घोडमारे या विद्यार्थिनीने ९३.८० टक्के गुण मिळवत सिंदी परीक्षा केंद्रातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.



अक्षरा ही सिंदी येथील गुंज कॉन्व्हेंट स्कूलची विद्यार्थिनी असून, तिचे वडील निलेश घोडमारे हे शेतकरी आहेत. घरच्या आर्थिक मर्यादा असूनही मुलींनी शिकावे आणि यशस्वी व्हावे, यासाठी ते सातत्याने परिश्रम घेत असतात. अक्षराला एक बहीण असून, वडिलांचे शेतमजुरीचे कष्ट हेच तिच्या शिक्षणामागचे खरे प्रेरणास्थान ठरले आहेत.निकाल जाहीर झाल्यानंतर अक्षराने सिंदी केंद्रातून प्रथम क्रमांक पटकावल्याचे समजताच तिच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण पसरले. तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळले.या यशाचे श्रेय अक्षराने तिच्या शिक्षकांना आणि शाळेच्या सततच्या मार्गदर्शनाला दिले आहे. शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी तिचे विशेष अभिनंदन करत भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अक्षराच्या या यशामुळे शाळा, कुटुंब आणि परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.


---

# सुनेनंतर आठवड्यातच सासऱ्याचा मृत्यू; बिटरगाव श्रीमध्ये शोककळा

**सोलापूर । प्रतिनिधी**

बिटरगाव श्री (ता. मोहोळ) येथे घडलेल्या एकामागून एक दुःखद घटनांनी गावावर शोककळा पसरली आहे. सुनेच्या अपघाती मृत्यूच्या दुःखातून सावरत असतानाच सासऱ्याचाही हृदयविकाराच्या तीव्र धक्याने मृत्यू झाल्याने संपूर्ण गाव शोकमग्न झाला आहे.

मनीषा नितीन मुरूमकर (वय ३४) यांचा ७ मे रोजी नगर येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला होता. शेतातील बोअरवेलची मोटार काढत असताना दावे तुटून लाकूड डोक्याला लागल्याने त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांच्या मागे पती, तीन मुले, सासू आणि सासरे असा परिवार होता. त्यांच्या दशक्रियाविधीसाठी येणारा शुक्रवार (१६ मे) निश्चित करण्यात आला होता.





मात्र, त्याआधीच आज (१४ मे) मध्यरात्री साडेबारा वाजताच्या सुमारास सासरे लालासाहेब विनायक मुरूमकर (वय ६१) यांचे राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. सुनेच्या मृत्यूने ते प्रचंड व्यथित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, नातवंडे, एक भाऊ व दोन बहिणी असा परिवार आहे.लालासाहेब मुरूमकर हे बिटरगाव श्री विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष होते. तसेच सेवानिवृत्त आदर्श शिक्षक हंबीरराव मुरूमकर यांचे चुलत बंधू होते. गावातील एक सुसंस्कृत, शांत आणि लोकाभिमुख व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

---

# छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**परभणी । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८व्या जयंतीनिमित्त जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात साध्या पण उत्साही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीधर देशमुख होते. त्यांनी संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी परिसरात 'जय संभाजी'च्या घोषणा देण्यात आल्या.

समितीचे अध्यक्ष अमोल जाधव यांनी महाराजांच्या धैर्य, बुद्धिमत्ता आणि स्वराज्यासाठी त्यांनी दिलेल्या बलिदानावर भाष्य केले. सुहास पंडित यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी सांगितले की, हा कार्यक्रम केवळ उत्सव नसून, इतिहासातील महान योद्ध्यांच्या विचारांना जपण्याचा एक प्रयत्न आहे.



कार्यक्रमात संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी युवा अध्यक्ष अमोल जाधव, प्रवक्ते सुहास पंडित, युवा प्रदेश सरचिटणीस वैजनाथ देवकते, सेवादल शहराध्यक्ष डॉ. सजी अहमद खान, विचार विभाग जिल्हाध्यक्ष सत्तार पटेल, तालुकाध्यक्ष कल्याण लोहट, राजेश रेंगे, राम कुरे, दिगंबर खरवडे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. सजी अहमद खान यांनी आभार मानले.

---

# वाघाच्या हल्ल्याने तेंडूपत्ता तोडणाऱ्या महिलेचा मृत्यू

## चंद्रपूर जिल्ह्यात वन्यजीवांमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण

**चिमूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील जंगलकाठच्या भागांमध्ये वाघांच्या हल्ल्याचे सत्र सुरूच असून पुन्हा एकदा तेंडूपत्ता संकलन करणाऱ्या महिलेला वाघाने ठार केल्याची थरारक घटना घडली आहे. चिमूर तालुक्यातील पळसगाव वनपरिक्षेत्रातील करबडा येथे सकाळी साडे नऊच्या सुमारास घडलेल्या या घटनेने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

कचराबाई अरुण भरडे (वय ५६, रा. करमाळा) ही महिला आपल्या पतीसोबत तेंडूपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेली होती. यावेळी झुडपांत दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक तिच्यावर हल्ला चढवला. महिलेच्या ओरडण्याचा आवाज ऐकून तिचा पती धावून आला, परंतु वाघाने तोंडात पकडून फरफटत नेत असलेली पत्नी पाहून तो हादरला. त्याने तात्काळ गावात धाव घेत ग्रामस्थांना माहिती दिली. नागरिक घटनास्थळी धावत आले असता महिलेचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला.या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी जंगल व गावांना कुंपण घाला, मृताच्या कुटुंबातील सदस्याला नोकरी द्या अशा मागण्या करत काही काळ आक्रमक भूमिका घेतली. अखेर वनविभाग व पोलिसांनी समजूत काढल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी चिमूर येथील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आला.यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी योगिता तरार, वनपाल विनोद किलनाते, अमोल कवासे, वनरक्षक जरारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मल्हार, तसेच अन्य कर्मचारी आणि वनमजूर उपस्थित होते. वनविभागाच्या वतीने मृतक कुटुंबाला तात्काळ ५० हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे.गेल्या चार दिवसांत या भागात वाघाच्या हल्ल्यातील ही सहावी बळी ठरली आहे. सध्या तेंडूपत्ता हंगाम सुरू असल्याने हजारो मजूर दररोज पहाटे जंगलात जात असून रोजगाराच्या निमित्ताने जीव धोक्यात घालून काम करत आहेत. वाघ व इतर वन्यजीव मानवी वस्त्यांच्या सीमारेषेवर येऊ लागल्याने मानवी-वन्यजीव संघर्ष अधिक गंभीर स्वरूप धारण करीत आहे.जिल्ह्यात वाघांची संख्या सुमारे ३०० च्या आसपास असून, तेंडूपत्ता संकलनाच्या हंगामात दरवर्षी अशा घटनांमध्ये वाढ होताना दिसते. वनविभागाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये नागरिकांचे जंगलात येणे रोखणे कठीण ठरत आहे. दरम्यान, मुख्य वनसंरक्षक जितेंद्र रामगावकर यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे यासंदर्भात बैठक पार पडली असून, मात्र त्यातील निर्णयांची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

## आमदार समीर कुणावार यांच्या उपक्रमाचे खुले कौतुक

# समाधान शिबीरच्या राज्यभर गाजलेल्या यशाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून प्रशंसा!



**प्रतिक हिवंज । हिंगणघाट**

वर्धा येथे पार पडलेल्या विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार समीर कुणावार यांच्या समाधान शिबीर या अभिनव उपक्रमाचे खुलेआम कौतुक केले. पहिल्याच आमदारकीत ५० हजारांहून अधिक नागरिकांपर्यंत थेट शासकीय सेवा पोहोचवून कुणावार यांनी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.या उपक्रमाच्या यशामुळे आमदार आपल्या दारी या नावाने ही योजना आता संपूर्ण राज्यात राबवली जात आहे. परिणामी शासकीय सेवा अधिक तातडीने आणि सुलभतेने नागरिकांपर्यंत पोहोचत आहेत.

कार्यक्रमाला खासदार प्रफुल पटेल, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, माजी खासदार रामदासजी तडस, आमदार दादाराव केचे, समीर कुणावार, राजेश बकाणे, सुमित वानखेडे, भाजप जिल्हाध्यक्ष सुनील गफाट आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्र्यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, समाधान शिबीर ही योजना म्हणजे सरकार आणि जनतेमधील दुवा अधिक बळकट करणारा उपक्रम आहे. यामुळे नागरिकांची कामे तत्काळ मार्गी लागतात आणि शासकीय यंत्रणांवरचा विश्वास दृढ होतो.कार्यक्रमात अनेक लाभार्थींनी आपल्या अनुभव कथनाद्वारे आमदार समीर कुणावार यांचे आभार मानले.



## अखेर नांदोऱ्याला मिळाली हक्काची स्मशानभूमी!

# आमदार आपल्या दारी अभियानाचे फलित–अनेक वर्षांचा संघर्ष संपुष्टात

**वर्धा । राहुल मून**

सेवाग्रामजवळील नांदुरा ग्रामपंचायतला अखेर हक्काची स्मशानभूमी मिळाली आहे. अनेक वर्षांपासून स्मशानभूमीसाठी लढा देणाऱ्या नांदोरा ग्रामस्थांना आता अंतिम विधीसाठी स्वतःची जागा उपलब्ध झाली आहे. आजवर या गावात स्मशानभूमी नसल्याने मृत व्यक्तीच्या अंत्यविधीला देखील अडचणींना सामोरे जावे लागत होते. ग्रामस्थांनी वेळोवेळी महसूल आणि वन विभागाकडे निवेदने दिली, परंतु याकडे कोणीही लक्ष दिले नाही. मात्र आमदार राजेश बकाने यांच्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान आणि आमदार आपल्या दारी या उपक्रमामुळे नांदोऱ्याच्या विकासाला नवा दिशा मिळाली.या अभियानादरम्यान माजी सरपंच दिपाली नागतोडे यांनी स्मशानभूमीचा प्रश्न आमदारांच्या समोर मांडला. आमदार बकाने यांनी तत्काळ उपविभागीय अधिकारी दीपक करंडे आणि



वन परिक्षेत्र अधिकारी रुपेश खेडकर यांना निर्देश देत कार्यवाहीस सुरुवात केली.महसूल आणि वन विभागाच्या समन्वयातून तातडीने निर्णय घेण्यात आला. तहसीलदार संदीप पुंडेकर यांनी नांदुरा गावासाठी लागणारी जमीन उपलब्ध करून दिली आणि त्याचा अधिकृत सातबारा उताराही ग्रामस्थांच्या ताब्यात दिला.या ऐतिहासिक निर्णयावेळी उपविभागीय अधिकारी दीपक करंडे, वन परिक्षेत्र अधिकारी रुपेश खेडकर, तहसीलदार संदीप पुंडेकर, गटविकास अधिकारी प्रफुल लोखंडे, माजी सरपंच दिपाली नागतोडे, विनोद नागतोडे, प्रमोद चव्हाण, सुधाकर मोहदुरे, सुरेश मोहदुरे, प्रशांत देवतळे, चेतन वैरागडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.ग्रामस्थांनी आमदार राजेश बकाने आणि सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला एक अत्यावश्यक प्रश्न अखेर मार्गी लागला आहे.

## देवनिल विद्यालय टेकाडीचा उत्कृष्ट निकाल; सुयोग वसाके ९५.६० टक्के गुणांसह तालुक्यात प्रथम

**मुल । प्रतिनिधी**

विद्यासागर शिक्षण प्रसारक मंडळ मुल द्वारा संचालित देवनिल विद्यालय टेकाडी येथील विद्यार्थ्यांनी मार्च २०२५ मध्ये पार पडलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (डडउ) परीक्षेत घवघवीत यश संपादन करत विद्यालयाचा यशाचा पल्ला आणखी उंचावला आहे. यंदाही विद्यालयाने आपली उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे.

सुयोग गजानन वसाके याने ९५.६० टक्के गुण मिळवून संपूर्ण मुल तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विद्यालयामधून दुसरा क्रमांक प्रथमेश मार्कंडी गोहणे (८३.६०टक्के), तिसरा क्रमांक भुवन सुनिल कोटरंगे (७८.४० टक्के), चौथा क्रमांक प्रवज्ञा मुकेश रामटेके (७५.८० टक्के) आणि पाचवा क्रमांक अनुष बंडु सोनुले (७४.४० टक्के) याने मिळविला आहे.




या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी ४ विद्यार्थ्यांनी प्राविण्य, १५ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, २२ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी, तर १० विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण श्रेणीत यश मिळवले.सर्व



यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी आमदार व संस्थाध्यक्ष देवरावजी भांडेकर, उपाध्यक्षा डॉ. स्मिता भांडेकर, सचिव डॉ. महेश भांडेकर, मुख्याध्यापक राजेश सावरकर, सरपंच कालीदास खोब्रागडे, उपसरपंच योगेश लेनगुरे, माजी सरपंच डॉ. गजानन चौधरी, बंडु कोटरंगे यांच्यासह पालक व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांचा भरघोस यश!

## वडनेर येथील निलकंठ मुरार घटवाई विद्यालयाचा १० वीचा निकाल ९७.२९%

**प्रतिक हिवंज । हिंगणघाट**

हिंगणघाट तालुक्यातील वडनेर येथील निलकंठ मुरार घटवाई हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या संस्थेचा २०२४-२५ च्या इ.१० वीचा निकाल अत्यंत उत्साहवर्धक लागला आहे. यावर्षी बोर्ड परीक्षेला प्रविष्ठ झालेल्या १४८ विद्यार्थ्यांपैकी १४४ विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होत ९७.२९% इतका उल्लेखनीय निकाल शाळेने नोंदवला.यामध्ये ७३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवली असून त्यामधून अनेक विद्यार्थ्यांनी शाळेच्या यशात मानाचा तुरा खोवला आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी विविध विषयांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. मराठी विषयात ५१, हिंदीत ५८, इंग्रजीत ५२, गणितात ३४, विज्ञानात



४६ आणि सामाजिक शास्त्रात ५१ विद्यार्थ्यांनी ७५% पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

**शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांची यादी पुढीलप्रमाणे:**

१.ओम पंजारामी नागपूरे - ४७१/५०० (९४.८०%) - जंगोना
२.कु. सेजल भगवानजी घाटुरले - ४६३/५०० (९२.६०%) - वडनेर
३.कु. दिव्यानी पांडुरंग तुमसरे - ४४९/५०० (८९.८०%) - दोडुडा
४.यश अनिल सरोदे - ४४८/५०० (८९.६०%) - वडनेर
५.कु. भाग्यश्री गणपत चिमणे - ४४१/५०० (८८.२०%) - येरणगाव
६.कु. अश्विनी योगेश येडे - ४४०/५०० (८८.००%) - दोडुडा
७.कु. आचल विलास कारळेकर - ४३३/५०० (८६.६०%) - वडनेर
८.संगर्ष महेन्द्र वैद्य - ४३०/५०० (८६.४०%) - बामर्डा
९.वेदांत चंद्रकांत महाजन - ४२५/५०० (८५.००%) - वडनेर
१०.कु. संजीवनी कवडू पडमकार - ४२३/५०० (८४.६०%) - वडनेर

या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य, तसेच शाळेतील शिक्षकवृंदाचे मार्गदर्शन हे कारणीभूत असल्याचे मुख्याध्यापक रविंद्र गोडे यांनी सांगितले. संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र डागा यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## शेटफळ येथे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसणार; माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील शेटफळ गावासाठी वाढीव वीज क्षमतेसाठी मोठा निर्णय घेण्यात आला असून, येथे ५ एमवीए क्षमतेचा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार आहे. ही कामगिरी माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शक्य झाल्याचे स्पष्ट करत शेटफळचे सरपंच पांडुरंग लबडे यांनी विरोधकांनी फुकटचे श्रेय घेऊ नये, असा टोला लगावला आहे.

माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी जून २०२४ मध्ये तत्कालीन ऊर्जामंत्री चंद्रकांत पाटील यांना पत्र पाठवून, ३३/११ के.व्ही. सबस्टेशनमध्ये वाढीव ५ एमवीए ट्रान्सफॉर्मर बसवण्याची मागणी केली होती. याच पाठपुराव्याच्या अनुषंगाने कोळगाव, झरे, केम, वीट, उमरड, कविटगाव, शेटफळ आणि करमाळा शहर येथे वाढीव ट्रान्सफॉर्मर मंजूर झाले आहेत.

शेटफळ गावामध्ये या ट्रान्सफॉर्मरचे साहित्य पंधरा दिवसांपूर्वी दाखल झाले असून, सर्वच कामांचे एकत्रित उद्घाटन करण्यासाठी ग्रामपंचायतची तयारी सुरू होती. मात्र काही विरोधकांनी याच



ट्रान्सफॉर्मरच्या उद्घाटनाचा दावा करत श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला. जर ट्रान्सफॉर्मर त्यांच्या प्रयत्नातून मंजूर झाला असेल, तर त्यांनी त्याचा अधिकृत पुरावा द्यावा, अशी मागणी सरपंच लबडे यांनी केली आहे.

ते पुढे म्हणाले की, शेटफळ गावाच्या विकासासाठी संजयमामा शिंदे यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला आहे. त्यांच्या प्रयत्नांनीच वीजप्रश्न सोडविण्याचा मार्ग मोकळा झाला असून, त्यांचेच श्रेय इतरांनी घेऊ नये.

## मोरवड: महात्मा जोतीराव फुले विद्यालयाचा निकाल शंभर टक्के




**सोलापूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील मोरवड येथील महात्मा जोतीराव फुले विद्यालयाने यंदाच्या दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची उज्वल कामगिरी केली असून, विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने विद्यालयाचा गौरव उंचावला आहे. यंदा पहिल्या क्रमांकाचे मानकरी चि. हनुमंत नामदेव नाळे व कु. साक्षी राजेंद्र नाळे या दोघांनी ९३.६० टक्के गुण मिळवत संयुक्तरित्या प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांच्यानंतर चि. अमोल रमेश कुऱ्हाडे (८०.८० टक्के), चि. यशराज दादासाहेब काळे (८०.६० टक्के), चि. ओम दत्तात्रय नाळे (७८.६०टक्के) आणि कु. तनुजा रामचंद्र नाळे (७८.४०टक्के) यांनी यशस्वी कामगिरी केली.

शाळेच्या या घवघवीत यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन वसंत मोहोळकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीनवनाथ मोहोळकर तसेच शिक्षकवृंद व ग्रामस्थांनी केले आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यासाला, शिक्षकांच्या मार्गदर्शनाला आणि पालकांच्या सहकार्याला या यशाचे श्रेय दिले जात आहे. या निकालामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

## श्रीक्षेत्र आजनसरा तीर्थक्षेत्राला 'ब' दर्जासाठी मार्ग मोकळा

# घरकुलांसाठी शासकीय जमीन मंजुरीच्या दिशेने निर्णायक पाऊल

### आ.समीर कुणावार यांच्या प्रयत्नांना यश,चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक

**आजनसरा । प्रतिक हिवंज**

विदर्भातील प्राचीन आणि श्रद्धास्थानी श्रीक्षेत्र आजनसरा देवस्थानाच्या विकासासाठी आमदार समीर कुणावार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश येत आहे. आजनसरा तीर्थक्षेत्राला 'क' दर्जा ऐवजी 'ब' दर्जा मिळावा, ग्रामीण भागातील घरकुलासाठी शासकीय जमिनीची उपलब्धता व्हावी आणि वन विभागाच्या जमिनीवर वर्षानुवर्षे अतिक्रमण करून राहत असलेल्या नागरिकांना कायमस्वरूपी पट्टे देण्यात यावेत, या विषयांवर १४ मे रोजी मुंबईत महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत आजनसरा तीर्थक्षेत्राला 'ब' दर्जा देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. श्री संत भोजाजी महाराज देवस्थान, आजनसरा या तीर्थक्षेत्राला 'क' ऐवजी



'ब' पर्यटन दर्जा मिळावा यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रस्ताव सादर करावा, असे स्पष्ट निर्देश महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले.

त्याचप्रमाणे ग्रामीण भागात घरकुलासाठी शासकीय जमिनी उपलब्ध करून देण्याचा विषयही बैठकीत चर्चिला गेला. विशेषतः २०११ नंतर, म्हणजे २०१५-१६ पर्यंत अतिक्रमण करून वास्तव्यास असलेल्या नागरिकांनाही घरकुल योजनेचा लाभ मिळावा, यासाठी नवे धोरण जाहीर होण्याची शक्यता असल्याचे संकेत यावेळी देण्यात आले.आमदार समीर कुणावार यांनी या सर्व मुद्द्यांचा सातत्याने पाठपुरावा केला होता. महाराष्ट्र अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ दरम्यानही त्यांनी हे विषय विधानसभेत प्रभावीपणे मांडले होते. त्याच पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत ही बैठक आयोजित करण्यात आली होती.या निर्णयांमुळे आजनसरा तीर्थक्षेत्राच्या विकासाला गती मिळणार असून, पर्यटन वाढीस चालना मिळेल आणि स्थानिक नागरिकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील. आमदार समीर कुणावार यांनी या निर्णयांचे स्वागत करत ही सुरुवात असून, पुढील काळात अधिक विकास साधण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील, असे नमूद केले.

# पत्रकार सुरक्षा समितीचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

## अनेक मान्यवरांची उपस्थिती, पत्रकारांची गर्दी, हॉल खचाखच





**माळशिरस । प्रतिनिधी**

पत्रकार संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या पत्रकार सुरक्षा समितीचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा सोलापूर येथील समाज कल्याण केंद्रात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार सुरक्षा समितीचे प्रदेशाध्यक्ष यशवंत पवार होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व पत्रमहर्षी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी यशवंत पवार यांनी पत्रकार सुरक्षा समितीच्या गेल्या आठ वर्षांतील कार्याचा आढावा घेतला. प्रभावी पत्रकार संरक्षण कायदा, ज्येष्ठ पत्रकारांसाठी समान पेन्शन योजना, आरोग्य व विमा योजना, यादीबाह्य साप्ताहिकांना पुन्हा जाहिरात मिळवून देणे, पत्रकारांची शासन दरबारात नोंदणी, युट्युब व पोर्टल माध्यमांना मान्यता, ग्रामीण पत्रकारांसाठी एसटी प्रवास सवलत आदी मुद्यांवर समिती सातत्याने आंदोलन, उपोषण, निवेदने व पत्रव्यवहाराच्या माध्यमातून सरकारकडे पाठपुरावा करत असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकारांचे प्रश्न सुटल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समितीच्या वतीने सन्मानित करण्यात आले. यंदाचा हा पुरस्कार सोहळा समितीच्या नवव्या वर्षात संपन्न झाला.

या कार्यक्रमास माजी सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण कदम, उच्च न्यायालयाचे वकील संजीव सदाफुले, निवृत्त पोलीस अधिकारी मीनाक्षीताई पेठे, प्रा. डॉ. अजय दासरी, शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख रामचंद्र सरवदे, कार्यकारी प्रदेशाध्यक्ष मिर्झागालिब मुजावर, दैनिक तुफान क्रांतीचे संपादक आन्सर तांबोळी, सोलापूर शहराध्यक्ष डॉ. यु. एफ. जानराव, व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

पुरस्कार वितरण सोहळ्यात 'आदर्श पत्रकार' म्हणून राज्यभरातील राजू वग्गू, अंबादास गज्जम, अरुण सिडगिद्दी, लक्ष्मण सुरवसे, अतुल भडंगे, रक्षंदा स्वामी, श्रीकृष्ण देशपांडे, कलीम शेख, सागर पवार, इम्तियाज अक्कलकोटकर, प्रवीण राठोड, इकबाल शेख, अजमेर शेख, सारिका चुंगे, नंदकुमार बगाडे, लहू कुमार शिंदे, अशपाक शेख, गणेश कारंडे, निरंजन बोधुल, वसीम बागवान आदींचा सन्मान करण्यात आला.

तसेच, आदर्श वकील म्हणून सिद्धांत सदाफुले व शिव कैलास झुरळे, आदर्श कुटुंब प्रमुख म्हणून आन्सर तांबोळी, कृषीभूषण म्हणून शुक्राचार्य शेंडेकर, आदर्श ग्रामपंचायत सेवक म्हणून महादेव शेवाळे, कृषीरत्न सागर गुंड, आदर्श रक्तपेढी म्हणून महात्मा बसवेश्वर रक्तपेढी सोलापूर (चेअरमन वैभव राऊत), रेशीमरत्न अमर पवार, यशस्वी उद्योजक वजीर मुलाणी आणि आदर्श समाजसेवक म्हणून तानाजी माने व सतीश गडकरी यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सिद्धार्थ भडकुंबे यांनी केले. आभारप्रदर्शन जिल्हा संघटक सादिक शेख यांनी केले. कार्यक्रमास राम हुंडारे, बंडू तोडकर, डॉ. कीर्तीपाल गायकवाड, अक्षय बबलाद, रोहित घोडके, योगिनाथ स्वामी, रमजान मुलाणी, प्रसाद जगताप, गोपी जगताप, इमरान आत्तार, वैजनाथ बिराजदार, अकबर शेख, संभाजी गोसावी, सचिन शिंदे, मच्छिंद्र सराटे, भागवत भरगंडे, विजयकुमार झुंजा, विनायक वाघमारे, मल्लिकार्जुन हेगडे, मेहबूब कादरी, शकील शेख व इतर पत्रकार, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजमाता अहिल्यादेवी त्रिशताब्दी जयंती निमित्त करमाळ्यात नियोजन बैठक

## दोन दिवसीय कार्यक्रमांची रूपरेषा ठरली



**सोलापूर । प्रतिनिधी**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त करमाळा शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यासाठी नियोजनाची बैठक करमाळा विश्रामगृह येथे उत्सव समितीच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत ३१ मे व २ जून रोजी होणाऱ्या कार्यक्रमांची सविस्तर रूपरेषा ठरवण्यात आली.

३१ मे रोजी सकाळी ९ वाजता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे पूजन बहुजन समाजातील आदर्श महिलांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यानंतर विविध क्षेत्रांमध्ये नावलौकिक मिळवलेल्या बहुजन समाजातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात येणार आहे. पश्चिम महाराष्ट्रातून येणाऱ्या समाज बांधवांसाठी शरबत व पाण्याचे वाटपही आयोजित करण्यात आले आहे.

२ जून सोमवार रोजी शहरातून राजमाता अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, यामध्ये धनगरी गजे, ढोल-ताशा, दांडपट्टा, तलवारबाजी, लेझीम, झांज पथक, वारकरी, विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक सादरीकरण, तसेच नामांकित डीजे बँड, ढोल, हलगी व इतर वाद्यांचा समावेश असणार आहे. ही मिरवणूक भवानी नाका येथून दुपारी ४ वाजता सुरू होणार असून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, दत्तपेठ, राशिन पेठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा, गुजर गल्ली, भवानी पेठ, तुळशी वृंदावन मार्गे अहिल्या स्मारक स्थळी तिचा समारोप होईल.या नियोजन बैठकीस बहुजन समाजातील अनेक मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भगवान गौतम बुद्ध जयंती भिंगारमध्ये उत्साहात साजरी



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जगाला करुणा, क्षमा आणि शांतीचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांची जयंती बुध्द पौर्णिमा भिंगारमधील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पावसाच्या रिमझिम सरीतही, जॉगिंग पार्कमधील भगवान गौतम बुद्ध यांच्या भव्य पुतळ्यास पुष्पवृष्टी करत उपस्थितांनी अभिवादन केले. या प्रसंगी जॉगिंग पार्कमध्ये स्वच्छता अभियानही राबविण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व बुद्ध वंदनेने करण्यात आली. यानंतर धम्ममित्र संजय भिंगारदिवे व विकास भिंगारदिवे यांनी त्रिशरण आणि पंचशील घेतले. जयंतीनिमित्त मिठाई वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, अशोक पराते, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, दीपक धाडगे, रतनशेठ मेहेत्रे, दीपकराव घोडके, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, रमेशराव वराडे, अभिजीत सपकाळ, सुधीरशेठ कपाळे, संजय भिंगारदिवे, सचिनशेठ चोपडा, विकास भिंगारदिवे, प्रकाश देवळालीकर, अनिल हळगावकर, शशिकांत पवार, राजू कांबळे, सरदारसिंग परदेशी, प्रांजली सपकाळ, सविता परदेशी, ईवान सपकाळ, संतोष लुणिया, सुहास देवराईकर, इंजी. नागेश खुरपे, मुन्ना वागस्कर, शेषराव पालवे, रामनाथ गर्जे, सिताराम परदेशी, नामदेवराव जावळे, योगेश चौधरी, प्रवीण परदेशी, हेमंत पंधारे, विशाल भामरे आदींसह अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजय सपकाळ यांनी म्हणाले की, भगवान बुद्धांनी मानवजातीसाठी करुणा, अहिंसा, क्षमा, शांती, त्याग, सेवा आणि समर्पण यांसारख्या नीतिसूत्रांची शिकवण दिली. धम्माच्या माध्यमातून त्यांनी आदर्श जीवनाचा मार्ग दाखविला असल्याचे सांगितले.

तसेच सचिनशेठ चोपडा, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, रमेश त्रिमुखे, रमेश वराडे, सुवर्णा महागडे-भिंगारदिवे, विकास भिंगारदिवे यांनी आपल्या मनोगतातून भगवान बुध्दांच्या विचारांची माहिती देत जीवनात धम्म स्वीकारण्याचे आवाहन केले. बुद्धांनी दिलेली पंचशील शिकवण हीच खऱ्या अर्थाने जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवते, असे मत वक्त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमातून धार्मिक, नैतिक व सामाजिक मूल्यांची प्रेरणा उपस्थितांना देण्यात आली.

# संगमेश्वर विद्यालय संगोबा यांचा दहावीचा १०० टक्के निकाल




**करमाळा । प्रतिनिधी**

श्री आदिनाथ महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचालित श्री संगमेश्वर विद्यालय, संगोबा या शाळेने सन २०२४-२५ च्या दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकाल मिळवून आपल्या गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली आहे. यंदाच्या निकालात ऋतुजा सुधीर भोगल हिने शाळेत प्रथम क्रमांक मिळविला आहे. ओंकार संतोष गायकवाड दुसऱ्या क्रमांकावर तर ओमराजे गोरख घाडगे तिसऱ्या क्रमांकावर राहिले.विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सुनिल शिंदे, शिक्षक वृंद रोडगे, भागडे, चांदणे, घाडगे, चव्हान, गायकवाड, पाटोळे, पिंटुमामा आणि संगोबा परिसरातील ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे मनापासून अभिनंदन केले आहे.विद्यालयाचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास हा ध्यास असल्याचे म्हणत शाळा सतत प्रगतिशील आणि कार्यरत आहे.

# मोदी थेट रणांगणात; जवानांची भेट घेण्यासाठी पोहोचले या एअरबेसवर



**पंजाब । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी सकाळी पंजाबमधील आदमपूर एअरबेसला भेट दिली. यावेळी एअरफोर्सच्या अधिकाऱ्यांनी त्यांना काही माहिती दिली. त्याचसोबत त्यांनी जवानांशी संवादसुद्धा साधला. भारतातील सर्वांत मोठ्या लष्करी हवाई तळांपैकी आदमपूर एअरबेस हे दुसरं सर्वांत मोठं एअरबेस आहे. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात आदमपूर एअरबेसने खूप महत्त्वाची भूमिका बजावली होती. भारत-पाकिस्तानदरम्यान सुरू असलेल्या संघर्षादरम्यान पाकिस्तानकडून आदमपूर एअरबेसचं मोठं नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला होता. पंजाबमधील आदमपूर एअरबेसचं सर्वांत मोठं नुकसान झाल्याचं पाकिस्तानी लष्कराचे मुख्य प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी सांगितलं होतं. परंतु भारताचे एअर मार्शल ए. के. भारती यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केलं की आपले सर्व लष्करी तळ आणि आपली यंत्रणा पूर्णपणे कार्यरत आहेत. यावरून कोणत्याही एअरबेसला कोणतंही मोठं नुकसान झालं नाही, हे स्पष्ट झालं. ऑपरेशन सिंदूरनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोमवारी पहिल्यांदा देशाला संबोधित केलं. यापुढे कोणताही दहशतवादी हल्ला झाला तर त्याला आमच्या पद्धतीने चोख प्रत्युत्तर दिलं जाईल, कुणीही अण्वस्त्रांची धमकी दिली, तरी त्याला भीक न घालता निर्णायक प्रहार केला जाईल, अशा स्पष्ट शब्दांत मोदींनी पाकिस्तानला इशारा दिला.

# बाल न्याय अधिनियम व वेठबिगार मुक्तीवर जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

समाजात वेगाने वाढणारी मानवी तस्करी ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली असून, तिचा बंदोबस्त करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन विभागीय पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांनी केले.जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय आणि श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानवी तस्करी व बाल न्याय अधिनियमविषयक कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी उगले बोलत होते. ही कार्यशाळा अहिल्यानगर येथील पोलीस रिक्रेशन हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती.

पुढे उगले म्हणाले की, मानवी तस्करी रोखण्यासाठी केवळ पोलिसच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाने सजग राहणे गरजेचे आहे. समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे, की कोणतीही शंका आल्यास तत्काळ पोलीस प्रशासनास माहिती कळविण्याचे त्यांनी आवाहन केले.

कार्यशाळेत बालकल्याण समितीचे अध्यक्ष ड. जयंत ओहळ यांनी बालकल्याण समितीची रचना व भूमिका विषद केली. जिल्हा बालसंरक्षण अधिकारी वैभव देशमुख यांनी बाल न्याय (मुलांचे काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ यावरील सविस्तर माहिती दिली. विशेष बाल पोलीस पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र इंगळे यांनी बालांचे लैंगिक गुन्हे संरक्षण कायदा २०१२ (पोस्को) यावर विवेचन केले. ड. अनुराधा येवले यांनी पिटा व पोस्को कायद्याचे सखोल विश्लेषण केले. इंटरनॅशनल जस्टीस मिशनचे गोरख जाधव यांनी मानवी तस्करी व वेठबिगार प्रकरणांची उदाहरणांसह चर्चा केली.

कार्यशाळेअखेर मानवी तस्करी व वेठबिगार मुक्तीची सामूहिक शपथ घेण्यात आली. कार्यशाळेत जिल्ह्यातील सुमारे ६० पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी माने यांनी केले. पोलीस निरीक्षक इशामोद्दीन पठाण यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी भरोसा सेलचे हेड कॉन्स्टेबल उमेश इंगोले, महिला व बालविकास दीपा आटोळे (एल एच सी), अर्चना काळे (एएचटीयू ), ए.के पवार (एलएचसी ), एस.ए. सय्यद (एएचटीयू ), श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाचे मानवी तस्करी व वेठबिगार मुक्ततेचे जिल्हा समन्वयक सिराज शेख, अंबादास गुंजाळ, राहुल साबळे, संध्या कुलकर्णी, मंगेश थोरात, मयुरी वनवे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .